सन १९६४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६०५

# शिवमहिम्नस्तोत्रं



REFBK-0014069
REFBK-0014069

ले.- अ.वा. मराठे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ....3.46.66........ वि: ....०२८५....
क्रमांक ....५६०५.......... नों. दि: ....७।९।६८....

सटीप व सपरिचय

# तीस तीन स्तोत्रें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८८८ वि: ८३१८५
क्रमांक २८०५ नों: दि: २।१।८४

: संपादक :

अनंत वासुदेव मराठे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८०८६
शाखा
REFBK-0014069
REFBK-0014069

: प्रकाशक :

तुकाराम बुक डेपो
माधवबाग, मुंबई ४.

प्रकाशक :

शिवराम नारायण कस्तुर
मॅनेजर, तुकाराम बुक डेपो,
बुकसेलर्स व पब्लिशर्स,
माधव बाग, मुंबई ४.

मूल्य १ रुपया

मुद्रक :

चिंतामणि रघुनाथ देसाई
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस
६, डॉ. भालेराव मार्ग
गिरगांव, मुंबई नं. ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 34551 दि:
क्रमांक नों: दि:

ॐ



प्रार्थनेनेंच मला आजपर्यंत जगविलेलें आहे. मी प्रार्थना करीत नसतों तर मला कधींच वेड लागलें असतें. सार्वजनिक व खासगी आयुष्यांत माझ्यावर दुर्धर प्रसंग ओढवले कीं त्या वेळीं मला क्षणिक निराशेनें भेडसावलें होतें. पण प्रार्थनेमुळेंच मी त्या त्या प्रसंगांवर मात करूं शकलों...........

शरीराला अन्नाची तशीच आत्म्याला प्रार्थनेची आवश्यकता आहे............

(म. गांधी)

★

# प्रास्ताविक दोन शब्द

स्तोत्र याचा अर्थ स्तुति असा आहे. अर्थात् यांत परमेश्वराची व त्याच्या नाना अवतारांची स्तुति व प्रार्थना असून धर्म–अर्थ–काम आणि मोक्ष असे जे चार पुरुषार्थ मानव जन्माला आल्यावर साधावयाचे असतात ते साध्य होण्यासाठींच यांचा उपयोग करावयाचा असतो.

' एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ' या श्रुतिवचनाप्रमाणें परमेश्वराचीं नांवें अनेक असलीं तरी त्यांनीं निर्देशिलेलें परम तत्त्व किंवा शक्ति एकच आहे हा हिंदुधर्माचा सिद्धान्त आहे. म्हणून साधकाचें उपास्य दैवत कोणतेंहि असलें तरी आणि त्यानें कोणत्याही देवतेची स्तुति केली तरी " आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥ " या न्यायानें अंतीं ती त्या सर्वव्यापी व सर्वसाक्षी परमेश्वरालाच पोंचते. साधकाच्या बौद्धिक व मानसिक कमीजास्त अधिकाराप्रमाणें व पूर्वसंस्कारांप्रमाणें तो वेगवेगळ्या देवतांकडे आकर्षिला जातो इतकेंच. म्हणूनच या पुस्तकांत या सर्वांच्या उपयोगी पडावीं अशींच स्तोत्रें व प्रार्थना आम्हीं निवडल्या आहेत.

हीं सगळीं स्तोत्रें व प्रार्थना साक्षात्कारी व्यक्तींनीं केलेल्या असून अनुभवसिद्ध आहेत. त्या त्या अधिकारी व्यक्ति भावावस्थेंत असतांना अगर त्यांच्या विशिष्ट कालच्या वा प्रसंगींच्या स्फूर्तींतूनच हीं निर्माण झालेलीं आहेत आणि त्यांना एक प्रकारें ' अपौरुषेयत्व ' प्राप्त झालें आहे.

हीं स्तोत्रें बहुतेक संस्कृत भाषेंतच आहेत. संस्कृत भाषा ही ' देवभाषा ' आहे. हिंदुमात्राचे धार्मिक संस्कार प्रायः याच भाषेंत

केले जातात. अपौरुषेय मानलेल्या वेदांपासून रामायण महाभारतादि ग्रंथ आणि त्यानंतरचीं पुराणें याच भाषेंत आहेत आणि कालिदास भवभूत्यादि कवींनीं आपली काव्यरचना केली ती याच भाषेंत. अशा रीतीनें या भाषेला हजारों वर्षांची परंपरा आहे. श्रीज्ञानेश्वरादि संतांनीं आध्यात्मिक ज्ञान आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना सुलभ व्हावें म्हणून मराठींतून ग्रंथरचना केली तरी धार्मिक कर्मकांडासाठीं संस्कृत भाषेचाच उपयोग त्या कालीं करण्यांत येत असे आणि आजही केला जातो.

आणि ही प्रथा आपल्याकडेच आहे असेंही नाहीं. मुस्लीमांची अलीकडची ग्रांथिक किंवा बोलभाषा उर्दू असली तरी त्यांचे धार्मिक विधि त्यांच्या मूळ पैगबरांच्या अरबी भाषेंत होत असतात; आणि ख्रिश्चन लोकांचा मूळ बायबल ग्रंथ यहुदी भाषेंत असून त्यांचे धार्मिक विधीही सध्याच्या त्यांच्या ग्रांथिक अगर बोलभाषेपेक्षां वेगळ्या भाषेंतूनच होत असतात. शिवाय परमेश्वराकडे लक्ष लागण्यासाठीं स्तुतीरूपी शब्दांत जें नादमाधुर्य असावें लागतें तें संस्कृत भाषेंत पुष्कळच आहे. म्हणून हीं स्तोत्रें त्या प्रासादिक शब्दांत म्हणणें कार्यसिद्धीच्या दृष्टीनेंही हितावहच होणारे आहे.

याला अर्थात् श्रीसमर्थ रामदासादि संतांनीं रचलेल्या स्तोत्रांचा अपवाद आहे. त्यांचें ‘ भीमरूपी ’ स्तोत्र हें श्री. महादेवशास्त्री जोशी यांनीं म्हटल्याप्रमाणें मारुतीच्या भीम पराक्रमाचें उडतें—उचंबळतें वर्णन आहे आणि ‘ जनमनांत वीरश्रीचा संचार व्हावा ’ हाच त्याचा हेतु आहे. तेव्हां प्रस्तुत कालीं त्याची आवश्यकता किती आहे हें वेगळें सांगावयास नकोच. श्रीसूर्यस्तुति, श्रीदुर्गास्तोत्र इत्यादि मराठी स्तोत्रांचाही हाच प्रकार आहे.

आज बाजारांत या स्तोत्रांचीं जीं पुस्तकें मिळतात तीं बहुतेक फक्त संहिता देणारीं असतात. त्यांत मुख्य भाग आणि प्रास्ताविक किंवा फलश्रुतीचा भाग यांची गल्लत झालेली असते. हें स्तोत्र कां किंवा कशासाठीं म्हणावयाचें हें मूलसंहितेंत सांगितलेलें असलें तरी सामान्य लोकांना त्याची कल्पना नसते. म्हणून आम्ही यांत त्यांचें स्पष्टीकरण—प्रास्तविक भाग आणि फलश्रुति हीं कंसांत देऊन केलें आहे. कंसाबाहेरचा भाग हाच मुख्य भाग महत्त्वाचा व आवर्तनासाठीं आवश्यक असल्यामुळें तेवढ्याचें पठन केल्यानेंही इष्ट कामना पूर्ण होतील आणि स्तोत्रपाठाचा कित्येकांना जो बाऊ वाटतो तोही दूर होईल अशी आमची धारणा आहे.

पुस्तकाची कल्पना मनांत येऊन व स्तोत्रांची निवड होऊन हस्तलिखित पुरें झालें तरी छपाईची व्यवस्था होऊन तें वाचकांच्या हातीं पडण्याला सुयोग्य प्रकाशकांची आवश्यकता होती. सुदैवानें मुंबईचे धर्मप्रेमी प्रकाशक ' मे. तुकाराम बुक डेपो ' चे चालक श्री. कस्तुर यांनीं प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली आणि ' न्यू भारत प्रिंटिंग प्रेस'च्या कामगारांनीं आत्मीयतेनें काम केलें म्हणून हें पुस्तक अल्प किंमतींत वाचकांच्या हातीं पडत आहे. त्याबद्दल आमच्याप्रमाणेंच धर्मशील वाचकांनींही त्यांचे आभार मानणें योग्य होईल.

इति शम्

कार्तिक शु ॥ १५<br>शके १८६३

अ. वा. मराठे

# अनुक्रमणिका


| स्तोत्र | | पृष्ठ |
|---|---|---|
| संकष्ट नाशन श्रीगणेशस्तोत्रम् | ... | १ |
| श्रीविष्णोर्नामाष्टकस्तोत्रम् | ... | २ |
| श्रीरामरक्षास्तोत्रम् | ... | ३ |
| श्रीकृष्णाष्टकम् | ... | ९ |
| श्रीपांडुरंगाष्टकम् | ... | १० |
| श्रीशिवमहिम्नस्तोत्रम् | ... | १२ |
| श्रीशिवमानस पूजा | ... | १८ |
| श्रीशिवस्तुति | ... | २० |
| श्रीआदित्यस्तोत्रम् | ... | २३ |
| श्रीसूर्याष्टकम् | ... | २५ |
| श्रीसूर्यस्तुति | ... | २६ |
| श्रीलक्ष्मीस्तोत्रम् | ... | २९ |
| श्रीमहालक्ष्म्यष्टकस्तोत्रम् | ... | ३२ |
| त्रिपुरसुंदरीस्तोत्रम् | ... | ३४ |
| श्रीदुर्गास्तोत्र | ... | ३६ |
| श्रीरामवरदायिनीस्तोत्र | ... | ३८ |
| श्रीदत्तात्रेयस्तोत्रम् | ... | ३९ |
| श्रीदत्तापराधक्षमापनस्तोत्रम् | ... | ४१ |
| चित्तस्थैर्यकर श्रीदत्तस्तोत्रम् | ... | ४३ |

| | | |
|---|---|---|
| श्रीनवग्रहस्तोत्रम् | ... | ४४ |
| श्रीनवग्रह-पीडा-परिहरस्तोत्र | ... | ४६ |
| श्रीशनैश्चरस्तोत्रम् | ... | ४७ |
| श्रीमंगलस्तोत्रम् | ... | ५० |
| श्रीबृहस्पतिस्तोत्रम् | ... | ५१ |
| श्रीमारुतिस्तोत्रम् | ... | ५२ |
| श्रीलक्ष्मी नृसिंहस्तोत्रम् | ... | ५४ |
| श्रीअन्नपूर्णास्तोत्रम् | ... | ५६ |
| श्रीतुलसीस्तोत्रम् | ... | ५९ |
| श्रीआत्मपंचकस्तोत्रम् | ... | ६० |
| श्रीगंगाष्टकम् | ... | ६२ |
| निर्वाणषट्कम् | ... | ६३ |
| श्रीवेंकटेश्वर मंगलस्तोत्रम् | ... | ६४ |
| श्रीशिवपंचाक्षरस्तोत्रम् | ... | ६६ |
| स्वल्प नित्यप्रार्थना | ... | ६८ |

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....3.4666...... दि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

॥ श्रीगणेशाय नमः ॥

## १ संकष्टनाशन श्रीगणेशस्तोत्र ।

[कोणत्याही शुभ कार्यारंभीं श्रीगणपति ह्या सुखकर्त्या दुःखहर्त्या व विघ्ननिवारक देवतेची प्रार्थना करण्याच्या प्रथेला अनुसरून श्री संकष्टनाशन गणपतिस्तोत्र इथें प्रथम देण्यांत येत आहे.

हें स्तोत्र नारदपुराणान्तर्गत असून विद्यार्थी, धनार्थी, पुत्रार्थी इत्यादि सकाम भक्तांप्रमाणें केवळ मोक्षकाम्यांनाही फलप्रद होतें अशी याची फलश्रुति आहे.]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ......
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

**श्री नारद उवाचः—**

प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् ।
भक्तावासं स्मरेन्नित्यं आयुःकामार्थसिद्धये ॥ १ ॥
प्रथमं वक्रतुंडं च एकदन्तं द्वितीयकम् ।
तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् ॥ २ ॥
लम्बोदरं पंचमंच षष्ठं विकटमेवच ।
सप्तमं विघ्नराजेंद्रं धूम्रवर्णं तथाष्टमम् ॥ ३ ॥
नवमं भालचंद्रंच दशमं तु विनायकम् ।
एकादशं गणपतिं द्वादशंतु गजाननम् ॥ ४ ॥
द्वादशैतानि नामानि त्रिसंध्यं यः पठेन्नरः ।
नच विघ्नभयं तस्य सर्वसिद्धिकरप्रभो ॥ ५ ॥

[ विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम् ।
पुत्रार्थी लभते पुत्रान् मोक्षार्थी लभते गतिम् ॥ ६ ॥
जपेद् गणपतिस्तोत्रं षड्भिर्मासैः फलं लभेत् ।
संवत्सरेण सिद्धिंच लभते नात्र संशयः ॥ ७ ॥
अष्टेभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा यः समर्पयेत् ।
तस्य विद्या भवेत् सर्वा गणेशस्य प्रसादतः ॥ ८ ॥ ]

( इति श्री नारदपुराणे संकष्टनाशन )
गणपतिस्तोत्रं संपूर्णम्

॥ श्री गजाननार्पणमस्तु ॥

---

## २ श्रीविष्णोर्नामाष्टकस्तोत्रम् ।

[ श्रीविष्णूच्या केवळ आठ नांवांचें हें स्तोत्र पठणाला अगदीं सुलभ असून बहुफलदायी आहे. हें वामनपुराणांत आलेलें आहे. ]

अच्युतं केशवं विष्णुं हरिं सत्यं जनार्दनम् ।
हंसं नारायणं चैवं एतन्नामाष्टकं शुभम् ॥ १ ॥
[ त्रिसंध्यं यः पठेन्नित्यं दारिद्र्यं तस्य नश्यति ।
शत्रुसैन्यक्षयं याति दुःस्वप्नं सुस्वप्नं भवेत् ॥ २ ॥
गंगायां मरणंचैव दृढाभक्तिस्तु केशवे ।
ब्रह्मविद्या बोधश्च तस्मान्नित्यं पठेन्नरः ॥ ३ ॥ ]

( इति श्री वामनपुराणे विष्णोर्नामाष्टकं स्तोत्रं संपूर्णम् । )

॥ श्रीमहाविष्णुः प्रीयताम् ॥

---

## ३ श्रीरामरक्षास्तोत्रम् ।

[ अगदीं अलीकडेपर्यंत महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या नित्यपाठांत असलेली आणि आजही कित्येक कुटुंबांतील लहान मुलांना शिकविली जाणारी 'रामरक्षा' हें एक स्तोत्रच असून तें बुधकौशिक ऋषीनें त्याला श्रीशंकरांनीं स्वप्नांत येऊन सांगितल्याप्रमाणें त्यानें दुसऱ्या दिवशीं लिहून काढलेलें आहे. अर्थात् त्याच्या मागें दैवी शक्ति आहे आणि त्यांतील मंत्रसामर्थ्य भूतपिशाच्चबाधा, दृष्टिदोष इत्यादि दूर करण्याला उपयुक्त म्हणून त्याचें पठण केलें जातें. याच्या पठणानें विभूति मंत्रून ती भूत–पिशाच्चानें झपाटलेल्या बालकाला लाविली असतां त्याची बाधा दूर होते.

श्रीरामचंद्राप्रमाणेंच रामदूत हनुमान आणि राम–कथा गाणारे वाल्मीकि ऋषि यांनाही यांत नमन आहे. ]

श्रीगणेशाय नमः । अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्रस्य ।
बुधकौशिकऋषिः । श्रीसीतारामचन्द्रो देवता ।
अनुष्टुप् छन्दः । सीता शक्तिः । श्रीमद्धनुमान्
कीलकम् । श्रीरामचन्द्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः ।

( अथ ध्यानम् )

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थं
पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।
वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं
नानालङ्कारदीप्तं दधतमुरुजटामण्डलं रामचन्द्रम् ॥

( इति ध्यानम् )

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥ १ ॥

ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम् ।
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितम् ॥ २ ॥

सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तंचरान्तकम् ।
स्वलीलया जगत्त्रातुमाविर्भूतमजं विभुम् ॥ ३ ॥

रामरक्षां पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथात्मजः ॥ ४ ॥

कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ॥ ५ ॥

जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितः ।
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ॥ ६ ॥

करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजित् ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः ॥ ७ ॥

सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
ऊरू रघूत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ॥ ८ ॥

जानुनी सेतुकृत् पातु जङ्घे दशमुखान्तकः ।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः ॥ ९ ॥

एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् ।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ॥ १० ॥

पातालभूतलव्योमचारिणश्छद्मचारिणः ।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ॥ ११ ॥

रामेति रामभद्रेति रामचन्द्रेति वा स्मरन् ।
नरो न लिप्यते पापैर्भुक्तिं मुक्तिं च विन्दति ॥ १२ ॥

जगज्जैत्रैकमन्त्रेण रामनाम्नाभिरक्षितम् ।
यः कण्ठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिद्धयः ॥ १३ ॥

वज्रपञ्जरनामेदं यो रामकवचं स्मरेत् ।
अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमङ्गलम् ॥ १४ ॥

आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः ।
तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः ॥ १५ ॥

आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम् ।
अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान् स नः प्रभुः ॥ १६ ॥

तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ ।
पुण्डरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ ॥ १७ ॥

फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ ।
पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥ १८ ॥

शरण्यौ सर्वसत्त्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम् ।
रक्षःकुलनिहन्तारौ त्रायेतां नो रघूत्तमौ ॥ १९ ॥

आत्तसज्यधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ
रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रतः पथि सदैव गच्छताम् ॥२०॥

संनद्धः कवची खड्गी चापबाणधरो युवा ।
गच्छन् मनोरथोऽस्माकं* रामः पातु सलक्ष्मणः ॥ २१ ॥

* या ठिकाणीं 'मनोरथो' याचीं मनः अरथः अशीं पदें असून अरथः गच्छन् ( पायीं चालणारा ) रामः मनः पातु असा अन्वय आहे. कित्येकांनीं मनोरथो रामः म्हणजे "मूर्तिमंत मनोरथच असा राम" असा अर्थ केला आहे तो बरोबर वाटत नाहीं.

रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली ।
काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघूत्तमः ॥ २२ ॥

वेदान्तवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः ।
जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः ॥ २३ ॥

इत्येतानि जपन् नित्यं मद्भक्तः श्रद्धयान्वितः ।
अश्वमेधाधिकं पुण्यं संप्राप्नोति न संशयः ॥ २४ ॥

रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् ।
स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नरः ॥ २५ ॥

रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुन्दरं
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ।
राजेन्द्रं सत्यसन्धं दशरथतनयं श्यामलं शान्तमूर्तिं
वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ॥२६॥

रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे ।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥ २७ ॥

श्रीराम राम रघुनन्दन राम राम
श्रीराम राम भरताग्रज राम राम ।
श्रीराम राम रणकर्कश राम राम
श्रीराम राम शरणं भव राम राम ॥ २८ ॥

श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि
श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि
श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥ २९ ॥

माता रामो मत्पिता रामचंद्रः
स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः ।
सर्वस्वं मे रामचन्द्रो दयालुर्
नान्यं जाने नैव जाने न जाने ॥ ३० ॥

दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे च जनकात्मजा ।
पुरतो मारुतिर्यस्य तं वन्दे रघुनन्दनम् ॥ ३१ ॥

लोकाभिरामं रणरङ्गधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम् ।
कारुण्यरूपं करुणाकरं तं श्रीरामचन्द्रं शरणं प्रपद्ये ॥ ३२ ॥

मनोजवं मारुततुल्यवेगं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ ३३ ॥

कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम् ।
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥ ३४ ॥

आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ३५ ॥

भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम् ।
तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम् ॥ ३६ ॥

रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥ ३७ ॥

रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे ।
सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ॥ ३८ ॥

इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रं संपूर्णम् ।

॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

## ४ श्रीकृष्णाष्टकम् ।

[ श्रीकृष्ण हा परमात्म्याचा आठवा अवतार. तत्पूर्वींचे अवतार अंशात्मक होते; पण श्रीकृष्ण हा पूर्णावतार होता. श्रीमद्भागवतादि ग्रंथांतून याचें चरित्र आणि गुणगान अनेक प्रकारें केलेलें आहे. आणि त्यानंतरही अनेकानेक संतांनीं नि भक्तांनीं याची आराधना करून मोक्षप्राप्ति करून घेतली आहे. श्रीरामचंद्राप्रमाणेंच श्रीकृष्ण हें दैवत भरतखंडांत अखिल हिंदुमात्राला पूज्य असेंच आहे. प्रस्तुत अष्टक श्रीशंकराचार्यांनी रचलेलें आहे. ]

श्रीगणेशाय नमः । श्रियाश्लिष्टो विष्णुः स्थिरचरगुरुर्वेदविषयो धियां साक्षी शुद्धो हरिरसुरहंताब्जनयनः । गदी शंखी चक्री विमलवनमाली स्थिररुचिः शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषयः ॥ १ ॥ यतः सर्वं जातं वियदनिलमुख्यं जगदिदं स्थितौ निःशेषं योऽवति निजसुखांशेन मधुहा । लये सर्वं स्वस्मिन् हरति कलया यस्तु स विभुः शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषयः ॥ २ ॥ असूनायम्यादौ यमनियममुख्यैः सुकरणैर्निरुध्येदं चित्तं हृदि विलयमानीय सकलम् । यमीड्यं पश्यंति प्रवरमतयो मायिनमसौ शरण्यो लोकेशो मम० ॥ ३ ॥ पृथिव्यां तिष्ठन्यो यमयति महीं वेद न धरा यमित्यादौ वेदो वदति जगतामीशममलम् । नियंतारं ध्येयं मुनिसुरनृणां मोक्षदमसौ शरण्यो लोकेशो मम० ॥ ४ ॥ महेंद्रादिर्देवो जयति दितिजान्यस्य बलतो न कस्य स्वातंत्र्यं

क्वचिदपि कृतौ यत्कृतिमृते । कवित्वादेर्गर्वं परिहरति योऽसौ विजयिनः शरण्यो लोकेशो मम० ॥ ५ ॥ विना यस्य ध्यानं व्रजति पशुतां सूकरमुखां विना यस्य ज्ञानं जनमृतिभयं याति जनता । विना यस्य स्मृत्या कृमिशतजनिं याति स विभुः शरण्यो लोकेशो मम० ॥ ६ ॥ निरातंकोत्तंकः शरणशरणो भ्रांतिहरणो घनश्यामो वामो व्रजशिशुवयस्योऽर्जुनसखः । स्वयंभूर्भूतानां जनक उचिताचारसुखदः शरण्यो लोकेशो मम० ॥ ७ ॥ यदा धर्मग्लानिर्भवति जगतां क्षोभकरणी तदा लोकस्वामी प्रकटितवपुः सेतुधृगजः । सतां धाता स्वच्छो निगमगुणगीतो व्रजपतिः शरण्यो लोकेशो मम० ॥ ८ ॥ [ इति हरिरखिलात्माराधितः शंकरेण श्रुतिविशदगुणोऽसौ मातृमोक्षार्थमाद्यः । यतिवरनिकटे श्रीयुक्त अविर्बभूव स्वगुणवृत उदारः शंखचक्राब्जहस्तः ॥ ९ ॥ ]

इति श्रीमच्छंकराचार्यविरचितं श्री कृष्णाष्टकं संपूर्णम् ॥

**श्रीकृष्णार्पणमस्तु**

---

## ५ श्री पांडुरंगाष्टकम्

[ श्रीपंढरपूर क्षेत्रनिवासी श्रीपांडुरंग हा महाराष्ट्रांतील भागवत धर्माचा मुख्य आधार. श्रीतुकाराममहाराजांचें तर तें परंपरेचें कुलदैवत होतें. आजही हजारो-लाखो—' वारकरी ' श्रीपांडुरंगाचे उपासक आहेत. प्रस्तुत अष्टकांत या श्रीपांडुरंगाची गुणवर्णनपर अनेक नांवांनीं स्तुति केलेली आहे. ]

श्रीगणेशाय नमः ॥ महायोगपीठे तटे भीमरथ्यां वरं पुंडरीकाय दातुं मुनींद्रैः । समागत्य तिष्ठंतमानंदकंदं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ १ ॥ तडिद्वाससं नीलमेघावभासं रमामंदिरं सुंदरं चित्प्रकाशम् । वरं त्विष्टिकायां समन्यस्तपादं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ २ ॥ प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां नितंबः कराभ्यां धृतो येन तस्मात् । विधातुर्वसत्यै धृतो नाभिकोशः परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ३ ॥ स्फुरत्कौस्तुभालंकृतं कंठदेशे श्रिया जुष्टकेयूरकं श्रीनिवासम् । शिवं शांतमीड्यं वरं लोकपालं परब्रह्मरूपं भजे पांडुरंगम् ॥ ४ ॥ शरच्चंद्रबिंबाननं चारुहासं लसत्कुंडलाक्रांतगंडस्थलांगम् । जपारागबिंबाधरं कंजनेत्रं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ५ ॥ किरीटोज्ज्वलत्सर्वदिक्प्रांतभागं सुरैरर्चितं दिव्यरत्नैरनर्घ्यैः । त्रिभंगाकृतिं बर्हमाल्यावतंसं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ६ ॥ विभुं वेणुनादं चरंतं दुरंतं स्वयं लीलया गोपवेषं दधानम् । गवां वृंदकानंदनं चारुहासं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ७ ॥ अजं रुक्मिणीप्राणसंजीवनं तं परं धाम कैवल्यमेकं तुरीयम् । प्रसन्नं प्रसन्नार्तिहं देवदेवं । परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ८ ॥ [ स्तवं पांडुरंगस्य वै पुण्यदं ये । पठंत्येकचित्तेन भक्त्याच नित्यम् ॥ भवांभोनिधिं तेऽपि तीर्त्वांऽत काले । हरेरालयं शाश्वतं प्राप्नुवंति ॥ ९ ॥

इति श्रीमच्छंकराचार्यविरचितं श्री पांडुरंगाष्टकं संपूर्णम्

॥ श्रीपांडुरंगार्पणमस्तु ॥

## ६ श्रीशिवमहिम्नस्तोत्रम् ।

[ ब्रह्मा–विष्णु–महेश या त्रिमूर्तीपैकीं महेश तथा श्रीशंकर ही देवता संहारकारी देवता म्हणून प्रसिद्ध आहे. तथापि ही जितकी उग्र तितकीच कल्याणकारी व भोळीही आहे ! पुराणकालीन देव-दैत्यांच्या संघर्षाच्या व वैमनस्याच्या वेळीं अनेक दैत्यांनीं या शिवाची आराधना करून इच्छित वर मिळविले व त्या वरांच्या जोरावर त्यांनीं जेव्हां देवांना सळो का पळो करून सोडलें तेव्हां श्रीविष्णूला अवतार घेऊन युक्तीनें श्रीशंकराच्या वरानें उन्मत्त झालेल्या त्या दैत्यांना मारून किंवा नमवून देवांवर आलेलें संकट निस्तरावें लागलें अशा कथा आहेत.

प्रस्तुत स्तोत्र हें पुष्पदन्त या नांवाच्या एका निस्सीम शिव-भक्त गंधर्वानें केलेलें असून पुराणांतील कथांचा त्याला आधार आहे.

श्रीशिवपूजेंत व इतर कांहीं देवतांच्या पूजेंतही अभिषेकासाठीं याचा उपयोग करतात.]

श्रीगणेशाय नमः ॥ पुष्पदन्त उवाच । महिम्नः पारं ते परमविदुषो यद्यसदृशी स्तुतिर्ब्रह्मादीनामपि तदवसन्नास्त्वयि गिरः । अथावाच्यः सर्वः स्वमतिपरिणामावधि गृणन् ममाप्येष स्तोत्रे हर निरपवादः परिकरः ॥ १ ॥ अतीतः पन्थानं तव च महिमा वाङ्मनसयोरतद्व्यावृत्त्या यं चकितमभिधत्ते श्रुतिरपि । स कस्य स्तोतव्यः कतिविधगुणः कस्य विषयः पदे त्वर्वाचीने पतति न मनः कस्य न वचः ॥ २ ॥ मधुस्फीता वाचः परमममृतं निर्मितवतस् तव ब्रह्मन् किं वागपि सुरगुरोर्विस्मय-

पदम्। मम त्वेतां वाणीं गुणकथनपुण्येन भवतः पुनामीत्यर्थेऽ-
स्मिन् पुरमथन बुद्धिर्व्यवसिता ॥ ३ ॥ तवैश्वर्यं यत्तत्
जगदुदयरक्षाप्रलयकृत् त्रयीवस्तु व्यस्तं तिसृषु गुणभिन्नासु
तनुषु। अभव्यानामस्मिन् वरद रमणीयामरमणीं विहन्तुं
व्याक्रोशीं विदधत इहैके जडधियः ॥ ४ ॥ किमीहः किंकायः
स खलु किमुपायस्त्रिभुवनं किमाधारो धाता सृजति किमुपादान
इति च। अतर्क्यैश्वर्ये त्वय्यनवसरदुःस्थो हतधियः कुतर्कोऽयं
कांश्चिन्मुखरयति मोहाय जगतः ॥ ५ ॥ अजन्मानो लोकाः
किमवयववन्तोऽपि जगतामधिष्ठातारं किं भवविधिरनादृत्य
भवति। अनीशो वा कुर्याद् भुवनजनने कः परिकरो यतो
मन्दास्त्वां प्रत्यमरवर संशेरत इमे ॥ ६ ॥ त्रयी साङ्ख्यं योगः
पशुपतिमतं वैष्णवमिति प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति
च। रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां नृणामेको
गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥ ७ ॥ महोक्षः खट्वाङ्गं परशु-
रजिनं भस्म फणिनः कपालं चेतीयत् तव वरद तन्त्रोपकरणम्।
सुरास्तां तामृद्धिं दधति तु भवद्भ्रूप्रणिहितां न हि स्वात्मारामं
विषयमृगतृष्णा भ्रमयति ॥ ८ ॥ ध्रुवं कश्चित् सर्वं सकल-
मपरस्त्वध्रुवमिदं परो ध्रौव्याध्रौव्ये जगति गदति व्यस्तविषये।
समस्तेऽप्येतस्मिन् पुरमथन तैर्विस्मित इव स्तुवञ्जिह्रेमि त्वां न
खलु ननु धृष्टा मुखरता ॥ ९ ॥ तवैश्वर्यं यत्नाद् यदुपरि
विरिञ्चिर्हरिरधः परिच्छेत्तुं यातावनलमनलस्कन्धवपुषः। ततो

भक्तिश्रद्धाभरगुरुगृणद्भ्यां गिरिश यत् स्वयं तस्थे ताभ्यां तव किमनुवृत्तिर्न फलति ॥ १० ॥ अयत्नादापाद्य त्रिभुवनमवैरव्यतिकरं दशास्यो यद् बाहूनभृत रणकण्डूपरवशान् । शिरःपद्मश्रेणीरचित चरणाम्भोरुहबलेः स्थिरायास्त्वद्भक्तेस्त्रिपुरहर विस्फूर्जितमिदम् ॥ ११ ॥ अमुष्य त्वत्सेवासमधिगतसारं भुजवनं बलात् कैलासेऽपि त्वदधिवसतौ विक्रमयतः । अलभ्या पातालेऽप्यलसचलिताङ्गुष्ठशिरसि प्रतिष्ठा त्वय्यासीद् ध्रुवमुपचितो मुह्यति खलः ॥ १२ ॥ यदृद्धिं सुत्राम्णो वरद परमोच्चैरपि सतीमधश्चक्रे बाणः परिजनविधेयत्रिभुवनः । न तच्चित्रं तस्मिन् वरिवसितरि त्वच्चरणयोर्न कस्या उन्नत्यै भवति शिरसस्त्वय्यवनतिः ॥ १३ ॥ अकाण्डब्रह्माण्डक्षयचकितदेवासुरकृपाविधेयस्यासीद् यस्त्रिनयन विषं संहृतवतः । स कल्माषः कण्ठे तव न कुरुते न श्रियमहो विकारोऽपि श्लाघ्यो भुवनभयभङ्गव्यसनिनः ॥ १४ ॥ असिद्धार्था नैव क्वचिदपि सदेवासुरनरे निवर्तन्ते नित्यं जगति जयिनो यस्य विशिखाः । स पश्यन्नीश त्वामितरसुरसाधारणभूत् स्मरः स्मर्तव्यात्मा न हि वशिषु पथ्यः परिभवः ॥ १५ ॥ मही पादाघाताद् व्रजति सहसा संशयपदं पदं विष्णोर्भ्राम्यद्भुजपरिघरुग्णग्रहगणम् । मुहुर्द्यौर्दौस्थ्यं यात्यनिभृतजटाताडिततटा जगद्रक्षायै त्वं नटसि ननु वामैव विभुता ॥ १६ ॥ वियद्व्यापी तारागणगुणितफेनोद्गमरुचिः प्रवाहो वारां यः पृषतलघुदृष्टः शिरसि ते । जगद्द्वीपाकारं जलधिवलयं तेन कृतमित्यनेनैवोन्नेयं

धृतमहिम दिव्यं तव वपुः ॥ १७ ॥ रथः क्षोणी यन्ता शत-
धृतिरगेन्द्रो धनुरथो रथाङ्गे चंद्रार्कौ रथचरणपाणिः शर इति ।
दिधक्षोस्ते कोऽयं त्रिपुरतृणमाडम्बरविधिर्विधेयैः क्रीडन्त्यो न
खलु परतन्त्राः प्रभुधियः ॥ १८ ॥ हरिस्ते साहस्रं कमलबलि-
माधाय पदयोर्यदेकोने तस्मिन् निजमुदहरं नेत्रकमलम् । गतो
भक्त्युद्रेकः परिणतिमसौ चक्रवपुषा त्रयाणां रक्षायै त्रिपुरहर
जागर्ति जगताम् ॥ १९ ॥ क्रतौ सुप्ते जाग्रत् त्वमसि फलयोगे
क्रतुमतां क्व कर्म प्रध्वस्तं फलति पुरुषाराधनमृते । अतस्त्वां
संप्रेक्ष्य क्रतुषु फलदानप्रतिभुवं श्रुतौ श्रद्धां बद्ध्वा कृतपरिकरः
कर्मसु जनः ॥ २० ॥ क्रियादक्षो दक्षः क्रतुपतिरधीशस्तनुभृता-
मृषीणामार्त्विज्यं शरणद सदस्याः सुरगणाः । क्रतुभ्रेषस्त्वत्तः
क्रतुफलविधानव्यसनिनो ध्रुवं कर्तुः श्रद्धाविधुरमभिचाराय हि
मखाः ॥ २१ ॥ प्रजानाथं नाथ प्रसभमभिकं स्वां दुहितरं गतं
रोहिद्भूतां रिरमयिषुमृष्यस्य वपुषा । धनुःपाणेर्यातं दिवमपि
सपत्राकृतममुं त्रसन्तं तेऽद्यापि त्यजति न मृगव्याधरभसः
॥ २२ ॥ स्वलावण्याशंसाधृतधनुषमह्नाय तृणवत् पुरः प्लुष्टं दृष्ट्वा
पुरमथन पुष्पायुधमपि । यदि स्त्रैणं देवी यमनिरत देहार्धघटना-
दवैति त्वामद्धा बत वरद मुग्धा युवतयः ॥ २३ ॥ श्मशानेष्वा-
क्रीडा स्मरहर पिशाचाः सहचराश्चिताभस्मालेपः स्रगपि
नृकरोटीपरिकरः । अमङ्गल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलं
तथापि स्मर्तॄणां वरद परमं मङ्गलमसि ॥ २४ ॥ मनः प्रत्यक्चित्ते

सविधमवधायात्तमरुतः प्रहृष्यद्रोमाणः प्रमदसलिलोत्सङ्गितदृशः ।
यदालोक्याह्लादं ह्रद इव निमज्ज्यामृतमये दधत्यन्तस्तत्त्वं किमपि
यमिनस्तत् किल भवान् ॥ २५ ॥ त्वमर्कस्त्वं सोमस्त्वमसि
पवनस्त्वं हुतवहस्त्वमापस्त्वं व्योम त्वमु धरणिरात्मा त्वमिति च ।
परिच्छिन्नामेवं त्वयि परिणता बिभ्रतु गिरं न विद्मस्तत् तत्त्वं
वयमिह तु यत् त्वं न भवसि ॥ २६ ॥ त्रयीं तिस्रो वृत्तीस्त्रिभुव-
नमथो त्रीनपि सुरानकाराद्यैर्वर्णैस्त्रिभिरभिदधत् तीर्णविकृति ।
तुरीयं ते धाम ध्वनिभिरवरुन्धानमणुभिः समस्तं व्यस्तं त्वां
शरणद गृणात्योमिति पदम् ॥ २७ ॥ भवः शर्वो रुद्रः पशुपति-
रथोग्रः सहमहांस्तथा भीमेशानाविति यदभिधानाष्टकमिदम् ।
अमुष्मिन् प्रत्येकं प्रविचरति देव श्रुतिरपि प्रियायास्मै धाम्ने
प्रविहितनमस्योऽस्मि भवते ॥ २८ ॥ नमो नेदिष्ठाय प्रियदव
दविष्ठाय च नमो नमः क्षोदिष्ठाय स्मरहर महिष्ठाय च नमः ।
नमो वर्षिष्ठाय त्रिनयन यविष्ठाय च नमो नमः सर्वस्मै ते तदि-
दमितिशर्वाय च नमः ॥ २९ ॥ बहलरजसे विश्वोत्पत्तौ भवाय
नमो नमः प्रबलतमसे तत्संहारे हराय नमो नमः । जनसुखकृते
सत्त्वोद्रिक्तौ मृडाय नमो नमः प्रमहसि पदे निस्त्रैगुण्ये शिवाय
नमो नमः ॥ ३० ॥ कृशपरिणतिचेतः क्लेशवश्यं क्वचेदं क्व च तव
गुणसीमोल्लङ्घिनी शश्वदृद्धिः । इति चकितममन्दीकृत्य मां
भक्तिराधाद् वरद चरणयोस्ते वाक्यपुष्पोपहारम् ॥ ३१ ॥
असितगिरिसमं स्यात् कज्जलं सिन्धुपात्रे सुरतरुवरशाखा लेखनी

पत्रमुर्वी । लिखति यदि गृहीत्वा शारदा सार्वकालं तदपि तव गुणानामीश पारं न याति ॥ ३२ ॥

असुरसुरमुनीन्द्रैरर्चितस्येन्दुमौले–
ग्रथितगुणमहिम्नो निर्गुणस्येश्वरस्य ।
सकलगणवरिष्ठः पुष्पदन्ताभिधानो
रुचिरमलघुवृत्तैः स्तोत्रमेतच्चकार ॥ ३३ ॥

अहरहरनवद्यं धूर्जटेः स्तोत्रमेतत्
पठति परमभक्त्या शुद्धचित्तः पुमान् यः ।
स भवति शिवलोके रुद्रतुल्यस्तथाऽत्र
प्रचुरतरधनायुः पुत्रवान् कीर्तिमांश्च ॥ ३४ ॥

महेशान्नापरो देवो महिम्नो नापरा स्तुतिः ।
अघोरान्नापरो मन्त्रो नास्ति तत्त्वं गुरोः परम् ॥ ३५ ॥

दीक्षा दानं तपस्तीर्थं ज्ञानं यागादिकाः क्रियाः ।
महिम्नस्तव पाठस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ॥ ३६ ॥

कुसुमदशननामा सर्वगन्धर्वराजः
शशिधरवरमौलेर्देवदेवस्य दासः ।
स खलु निजमहिम्नो भ्रष्ट एवास्य रोषात्
स्तवनमिदमकार्षीद् दिव्यदिव्यं महिम्नः ॥ ३७ ॥

सुरवरमुनिपूज्यं स्वर्गमोक्षैकहेतुं
पठति यदि मनुष्यः प्राञ्जलिर्नान्यचेताः ।

व्रजति शिवसमीपं किन्नरैः स्तूयमानः
स्तवनमिदममोघं पुष्पदन्तप्रणीतम् ॥ ३८ ॥
श्रीपुष्पदन्तमुखपङ्कजनिर्गतेन
स्तोत्रेण किल्बिषहरेण हरप्रियेण ।
कण्ठस्थितेन पठितेन समाहितेन
सुप्रीणितो भवति भूतपतिर्महेशः ॥ ३९ ॥

इत्येषा वाङ्मयी पूजा श्रीमच्छङ्करपादयोः ।
अर्पिता तेन देवेशः प्रीयतां मे सदाशिवः ॥ ४० ॥

तव तत्त्वं न जानामि कीदृशोऽसि महेश्वर ।
यादृशोऽसि महादेव तादृशाय नमोनमः ॥ ४१ ॥

**इति श्रीशिवमहिम्नस्तोत्रम् संपूर्णम् ॥**
**श्री सांबसदाशिवार्पणमस्तु**

---

## ७ श्री शिवमानसपूजा

[ श्रीशंकराचार्यकृत शिवमानसपूजेचे हे श्लोक नित्य पठण केल्यानें इहलोकीं सौख्य प्राप्त होऊन श्रीशिवाचें साक्षात् दर्शन होईल असें फल सांगितलेलें असून श्रीमद्व्यासांना याच्या पठनानेंच कैलासाला जातां आलें अशी याची महती गाइलेली आहे. ]

रत्नैः कल्पित मानसं हिमजलैः स्नानंच दिव्यांबरं
नानारत्नविभूषितं मृगमदामोदांकितं चंदनम् ॥
जातीचंपकबिल्वपत्ररचितं पुष्पंच धूपं तथा
दीपं देव दयानिधे पशुपते हृत्कल्पितं गृह्यताम् ॥ १ ॥

सौवर्णे नवरत्नखंडरचिते पात्रे घृतं पायसं
भक्ष्यं पंचविधं पयोदधियुतं रंभाफलं पानकम् ॥
शाकानामयुतं जलं रुचिकरं कर्पूरखंडोज्ज्वलम्
तांबूलं मनसा मया विरचितं भक्त्याप्रभो स्वीकुरु ॥ २ ॥

छत्रं चामरयोर्युगं व्यजनकं चादर्शकं निर्मलं
वीणाभेरि मृदंग काहलकलागीतंच नृत्यं तथा ॥
साष्टांगं प्रणतिः स्तुतिर्बहुविधा ह्येतत्समस्तं मया
संकल्पेन समर्पितं तव विभो पूजां गृहाण प्रभो ॥ ३ ॥

आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहं
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ॥
संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वागिरो ।
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥ ४ ॥

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा ।
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ॥
विहितमविहितं वा सर्वमेतत् क्षमस्व ।
जय जय करुणाब्धे श्री महादेव शंभो ॥ ५ ॥

इति श्रीमच्छंकराचार्यविरचिता श्रीशिवमानसपूजा ॥

॥ **श्री सांबसदाशिवार्पणमस्तु** ॥

——

## ८ श्रीशिवस्तुति

[ या शिवस्तुतींत पुराणांतील श्रीशिवकथांच्या अनुरोधानें निरनिराळ्या नांवांनीं त्याची स्तुति केलेली असून 'तुझ्याशिवाय मला कोणी तारणारा नाहीं' ( तुजवीण शंभो मज कोण तारी ) अशी करुणस्वरानें त्याला हाक मारलेली आहे. शेवटच्या श्लोकांत तप-तीर्थादींच्या जंजाळांत न पडतां केवळ श्रीशिवस्मरणान इष्ट-कामनासिद्धि होईल असें निर्धारानें सांगितलें आहे. स्तोत्र शुद्ध मराठींत असल्यामुळें पठणाला व वाचनाला सुलभ आहे. ]

कैलासराणा शिव चंद्रमौळी । फणींद्र माथां मुगुटीं झळाळी ॥
कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१॥
रवींदु दावानल पूर्ण भाळीं । स्वतेज नेत्रीं तिमिरौघ जाळी ॥
ब्रह्मांडधीशा मदनांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ २ ॥
जटा विभूती उटि चंदनाची । कपालमाला प्रित गौतमीची ॥
पंचानना विश्व निवान्तकारी । तुजवीण शंभो मज० ॥ ३ ॥
वैराग्य योगी शिव शूलपाणी । सदा समाधी निजबोधवाणी ॥
उमानिवासा त्रिपुरान्तकारी । तुजवीण शंभो मज० ॥ ४ ॥
उदारमेरू पति शैलजेचा । श्रीविश्वनाथ म्हणती सुरांचा ।
दयानिधी तो गजचर्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥५॥
ब्रह्मादि वंदी अमरादिनाथ । भुजंगमाला धरि सोमकान्त ।
गंगा शिरीं दोष महा विदारी । तुजवीण शंभो मज० ॥ ६ ॥
कर्पूरगौरी गिरिजा विराजे । हाळाहळें कंठ निळाच साजे ।
दारिद्र्यदुःखें स्मरणें निवारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ७॥

दा. क.

स्मशानक्रीडा करितां सुखावे । तो देवचूडामणि कोण आहे ।
उदासमूर्ति जटाभस्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ८॥
भूतादिनाथ अरि अंतकाचा । तो स्वामि माझा ध्वज शांभवाचा ।
राजा महेश बहुबाहुधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ ९॥
नंदी हराचा हर नंदिकेश । श्रीविश्वनाथ म्हणती सुरेश ।
सदाशिव व्यापक तापहारी । तुजवीण शंभो मज० ॥ १० ॥
भयानक भीम विक्राळ नग्न । लीलाविनोदें करि काम भग्न ।
तो रुद्र विश्वंभर दक्ष मारी । तुजवीण शंभो मज० ॥ ११ ॥
इच्छा हराची जग हें विशाळ । पाळी रची तो हरि ब्रह्मगोळ ।
उमापती भैरव विघ्नहारी । तुजवीण शंभो मज० ॥ १२ ॥
भागीरथीतीर सदा पवित्र । जेथें असे तारक ब्रह्ममंत्र ।
विश्वेश विश्वंभर त्रिनेत्रधारी । तुजवीण शंभो मज० ॥ १३ ॥
प्रयाग वेणी सकळा हराच्या । पदारविंदीं वहाती हरीच्या ।
मंदाकिनी मंगल मोक्षकारी । तुजवीण शंभो मज० ॥ १४ ॥
कीर्ती हराची स्तुति बोलवेना । कैवल्यदाता मनुजां कळेना ।
एकाग्रनाथ विष अंगिकारी । तुजवीण शंभो मज० ॥ १५ ॥
सर्वांतरीं व्यापक जो नियंता । तो प्राणलिंगाजवळी महंता ।
अंकीं उमा ते गिरिरूपधारी । तुजवीण शंभो मज० ॥ १६ ॥
सदा तपस्वी असे कामधेनू । सदा सतेज शतकोटि भानू ।
गौरीपती जो सदा भस्मधारी । तुजवीण शंभो मज० ॥ १७ ॥

कर्पूरगौर स्मरल्या विसांवा । चिंता हरी जो भजकां सदैवा ।
अंतीं स्वहीतसुचना विचारीं । तुजवीण शंभो मज० ॥ १८ ॥
विरामकाळीं विकळ शरीर । उदास चित्तीं न धरीच धीर ।
चिंतामणी चिंतनिं चित्तहारी । तुजवीण शंभो मज० ॥ १९ ॥
सुखावसानीं सकळें सुखाचीं । दु:खावसानीं टळती जगाचीं ।
देहावसानीं धरणी थरारी । तुजवीण शंभो मज० ॥ २० ॥
अनुहतशब्द गगनीं न माय । तिचे निनादें भव शून्य होय ।
कथा निजांगें करुणा कुमारी । तुजवीण शंभो मज० ॥ २१ ॥
शांतिस्वलीला वदनीं विकासे । ब्रह्मांडगोळीं असुनी न दीसे ।
भिल्ली भवानी शिवब्रह्मचारी । तुजवीण शंभो मज० ॥ २२ ॥
पीतांबरें मंडित नाभि ज्याची । शोभा जडीत वरि किंकिणींची
श्रीवेददत्त दुरितांतकारी । तुजवीण शंभो मज० ॥ २३ ॥
जिवाशिवांची जडली समाधी । विटला प्रपंचीं तुटली उपाधी ।
शुद्धस्वरें गर्जति वेद चारी । तुजवीण शंभो मज० ॥ २४ ॥
निदान कुंभ भरला अभंग । पहा निजांगें शिव ज्योतिलिंग ।
गंभीर धीर सुरचक्रधारी । तुजवीण शंभो मज० ॥ २५ ॥
मंदार बिल्वें बकुलें सुवासी । माला पवित्र वहा शंकरासी ।
काशीपुरीं भैरव विश्व तारी । तुजवीण शंभो मज० ॥ २६ ॥
जाई जुई चंपक पुष्पजाती । शोभे गळां मालतिमाळ हातीं ।
प्रतापसूर्य शरचापधारी । तुजवीण शंभो मज० ॥ २७ ॥

अलक्ष्यमुद्रा श्रवणीं प्रकाशे । संपूर्ण शोभा वदनीं विकासे ।
नेई सुपंथें भवपैलतीरीं । तुजवीण शंभो मज० ॥ २८ ॥

नागेश नामा सकळां जिव्हाळा । मना जपें रे शिवमंत्रमाळ ।
पंचाक्षरी ध्यानगुहाविहारी । तुजवीण शंभो मज० ॥ २९ ॥

एकांतिं ये रे गुरुराजस्वामी । चैतन्यरूपी शिव सूखनामी ।
शिणलों दयाळा बहुसाळ भारी । तुजवीण शंभो मज० ॥ ३० ॥

[ शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थासि जाऊं नको ।
योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको ।
काळाचें भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको ।
ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥ ३१ ॥]

॥ **श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु** ॥

---

## ९ श्रीआदित्यस्तोत्रम् ।

[ यांत श्रीसूर्यनारायणाचीं बारा नांवें प्रथम दिलेलीं असून प्रातःकालींच तीं उच्चारून श्रीआदित्यस्मरण केलें असतां दुःस्वप्ननाश, आरोग्यप्राप्ति, इ० फलें मिळतात असें पुढल्या फलश्रुतींत सांगितलें आहे. ]

आदित्यः प्रथमं नाम द्वितीयं तु दिवाकरः ।
तृतीयं भास्करः प्रोक्तश्चतुर्थं तु प्रभाकरः ॥ १ ॥

पञ्चमं तु सहस्रांशुः षष्ठं त्रैलोक्यलोचनः ।
सप्तमं हरिदश्वश्च अष्टमं तु विभाकरः ॥ २ ॥

नवमं दिनकरः प्रोक्तो दशमं द्वादशात्मकः ।
एकादशं त्रयोमूर्ति र्द्वादशं सूर्य एव च ॥ ३ ॥

[ द्वादशादित्यनामानि प्रातःकाले पठेन्नरः ।
दुःस्वप्नो नश्यते तस्य सर्वदुःखं च नश्यति ॥ ४ ॥

दद्रुकुष्ठहरं चैव दारिद्र्यं हरते ध्रुवम् ।
यः पठेत् प्रातरुत्थाय भक्त्या नित्यमिदं नरः ॥ ५ ॥

सौख्यमायुस्तथारोग्यं लभते मोक्षमेवच । ]
अग्निमीळे नमस्तुभ्यं इषेत्वोर्जेस्वरूपिणे ॥ ६ ॥

अग्नआयहिवीतये नमस्ते ज्योतिषां पते ।
शन्नोदेवी नमस्तुभ्यं जगच्चक्षुर्हि ते नमः ॥ ७ ॥

पद्मासनः पद्मकरः पद्मगर्भसमद्युतिः ।
सप्ताश्वरथसंयुक्तो द्विभुजः स्यात् सदा रविः ॥ ८ ॥

[ आदित्यस्य नमस्कारं ये कुर्वन्ति दिने दिने ।
जन्मान्तरसहस्रेषु दारिद्र्यं नोपजायते ॥ ९ ॥]

**॥ इति श्रीआदित्यस्तोत्रम् । श्रीआदित्यार्पणमस्तु ॥**

———

## १० श्रीसूर्याष्टकम्।

[ इतर देवतांच्या अष्टकांप्रमाणेंच यांतील आठ श्लोकांत श्रीसूर्यनारायणाला नमस्कार व इतरांत फलश्रुति आहे. हें ' श्रीसांब 'कृत आहे. ]

( श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसांब उवाचः- )

आदिदेव नमस्तुभ्यं प्रसीद मम भास्कर।
दिवाकर नमस्तुभ्यं प्रभाकर नमोऽस्तुते ॥ १ ॥

सप्ताश्वरथमारूढं प्रचंडं कश्यपात्मजम्।
श्वेतपद्मधरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥ २ ॥

लोहितं रथमारूढं सर्वलोकपितामहम्।
महापापहरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥ ३ ॥

त्रैगुण्यंच महाशूरं ब्रह्मविष्णुमहेश्वरम्।
महापापहरं देवं तं सूर्यं प्राणमाम्यहम् ॥ ४ ॥

बृहितं तेजः पुंजंच वायुराकाशमेवच।
प्रभुस्त्वं सर्वलोकानां तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥ ५ ॥

बंधूकपुष्पसंकाशं हारकुंडलभूषितम्।
एकचक्रधरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥ ६ ॥

तं सूर्यं जगत् कर्तारं महातेजः प्रदीपनम्।
महापापहरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥ ७ ॥

तं सूर्यं जगतां नाथं ज्ञानविज्ञानमोक्षदम् ।
महापापहरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥ ८ ॥

[ सूर्याष्टकं पठेन्नित्यं ग्रहपीडाप्रणाशनम् ।
अपुत्रो लभते पुत्रं दरिद्रो धनवान् भवेत् ॥ ९ ॥

आमिषं मधुपानंच यः करोति रवेर्दिने ।
सप्तजन्म भवेद् रोगी जन्मजन्म दरिद्रता ॥ १० ॥

स्त्री तैलमधुमांसानि यस्त्यजेत्तु रवेर्दिने । न व्याधिः
शोक दारिद्र्यं सूर्यलोकं स गच्छति ॥ ११ ॥]

॥ इति श्रीसूर्याष्टकस्तोत्रं संपूर्णम् ॥
॥ श्रीसूर्यनारायणार्पणमस्तु ॥

## ११ श्रीसूर्यस्तुति ।

[ श्रीसूर्य हा साऱ्या जगाचा आत्मा आहे. जगाच्या आरंभकालापासून त्याचें आकाशांत अत्यंत नियमितपणें भ्रमण चालू आहे. " सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च " असें त्याचें प्राचीन वैदिक ऋषींनीं वर्णन केलेलें असून सुप्रसिद्ध गायत्रीमंत्र हा श्रीसूर्यप्रार्थनापरच आहे. पुराणांतही त्याचें आलंकारिक व काव्यमय वर्णन अनेक ठिकाणीं आलेलें आहे. या वर्णनाला अनुसरूनच ही सूर्यस्तुति केलेली असून केवळ मराठी जाणणाऱ्यांनाही ही नित्यपाठाला उपयोगी आहे. ]

जयाच्या रथा एकची चक्र पाहीं ।
नसे भूमि आकाश आधार कांहीं ।
असे सारथी पांगुळा ज्या रथासी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ १ ॥

करीं पद्म माथां किरीटी झळाळी ।
प्रभा कुंडलांची शरीरा निराळी ।
पहा रश्मि ज्याची त्रिलोकासि कैसी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ २ ॥

सहस्रद्वयें दोनशें आणि दोन ।
क्रमी योजनें जो निमिषार्द्धतेन ।
मना कल्पवेना जयाच्या त्वरेसी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ ३ ॥

विधीवेदकर्मासि आधार कर्ता ।
स्वधाकार स्वाहादि सर्वत्र भोक्ता ।
असे अन्नदाता समस्तां जनांसी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ ४ ॥

युगें मंत्रकल्पांत ज्याचेनि होती ।
हरिब्रह्मरुद्रादि ज्या बोलिजेती ।
क्षयांतीं महाकाळरूप प्रकाशी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ ५ ॥

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि. ............
क्रमांक ........................ नों दि. ............

शशी तारका गोवुनी जो ग्रहांतें ।
त्वरें मेरु वेष्टोनियां पूर्वपंथें ।
भ्रमे जो सदा लोक रक्षावयासी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ ६ ॥

समस्तांसुरांमाजि तूं जाण चर्या ।
म्हणोनीच तू श्रेष्ठ त्या नाम सूर्या ।
दुजा देव तो दाखवीं स्वप्रकाशी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ ७ ॥

महामोह तो अंधकारासि नाशी ।
प्रभा शुद्धसत्त्वाचि अज्ञान नाशी ।
अनाथा कृपा जो करी नित्य ऐशी ।
नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ ८ ॥

कृपा ज्यावरी होय त्या भास्कराची ।
न पाहूं शके शत्रु त्याला विरंची ।
उभ्या राहती सिद्धि होऊनि दासी ।
नमस्कार त्या सूर्य० ॥ ९ ॥

फळें चंदनें आणि पुष्पेंकरोनी ।
पुजावें बरें एकनिष्ठा धरोनी ।
मनीं इच्छिलें पाविजे त्या सुखासी ।
नमस्कार त्या सूर्य० ॥ १० ॥

नमस्कार साष्टांग बापा स्वभावें।
करोनि तया भास्करालागिं ध्यावें
दरिद्रें सहस्रादि जो क्लेश नाशी।
नमस्कार त्या सूर्य० ॥ ११ ॥

वरी सूर्य आदित्य मित्रादि भानू।
विवस्वान इत्यादिही पादरेणू।
सदा वांच्छिती पूज्य ते शंकरासी।
नमस्कार त्या सूर्य० ॥ १२ ॥

॥ श्रीसूर्यनारायणार्पणमस्तु ॥

---

## १२ श्रीलक्ष्मीस्तोत्रम्

[ प्रपंचांत सुवर्णाचा महिमा केवढा मोठा असतो हें सांगावयास नकोच. 'सर्वेगुणाः कांचनमाश्रयन्ते' हें वचन प्रसिद्धच आहे. अशा या सुवर्णाची-कांचनाची-द्रव्याची श्रीलक्ष्मी ही देवता आहे. हिचें हें स्तोत्र दारिद्र्यनाशपर तर आहेच, पण भूत प्रेत-पिशाच-व्याघ्र इत्यादींपासून होणाऱ्या भयाचेंही निवारण करणारें आहे. 'अगस्ति' ऋषीनें केलेली ही स्तुति पहिल्या २३ श्लोकांत दिलेली असून पुढच्या दहा श्लोकांत श्रीलक्ष्मी देवीनें अगस्तीला निमित्त करून सर्व मानवांनाच दिलेलें वरदान सांगितलें आहे.]

श्रीगणेशाय नमः ॥ जय पद्मपलाशाक्षि जय त्वं श्रीपतिप्रिये। जय मातर्महालक्ष्मि संसारार्णवतारिणि ॥ १ ॥ महालक्ष्मि

नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं सुरेश्वरि । हरिप्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे ॥ २ ॥ पद्मालये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं च सर्वदे । सर्वभूतहितार्थाय वसुवृष्टिं सदा कुरु ॥ ३ ॥ जगन्मातर्नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे । दयावति नमस्तुभ्यं विश्वेश्वरि नमोऽस्तुते ॥ ४ ॥ नमः क्षीरार्णवसुते नमस्त्रैलोक्यधारिणि । वसुवृष्टे नमस्तुभ्यं रक्ष मां शरणागतम् ॥ ५ ॥ रक्ष त्वं देवदेवेशि देवदेवस्य वल्लभे । दारिद्र्यात्त्राहि मां लक्ष्मि कृपां कुरु ममोपरि ॥ ६ ॥ नमस्त्रैलोक्यजननि नमस्त्रैलोक्यपावनि । ब्रह्मादयो नमंते त्वां जगदानंददायिनी ॥ ७ ॥ विष्णुप्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं जगद्धिते । आर्तिहंत्रि नमस्तुभ्यं समृद्धिं कुरु मे सदा ॥ ८ ॥ अब्जवासि नमस्तुभ्यं चपलायै नमो नमः । चंचलायै नमस्तुभ्यं। ललितायै नमो नमः ॥ ९ ॥ नमः प्रद्युम्नजननी मातस्तुभ्यं नमोनमः । परिपालय भो मातर्मां तुभ्यं शरणागतम् ॥ १० ॥ शरण्ये त्वां प्रपन्नोऽस्मि कमले कमलालये । त्राहि त्राहि महालक्ष्मि परित्राणपरायणे ॥ ११ ॥ पांडित्यं शोभते नैव न शोभंति गुणा नरे। शीलत्वं नैव शोभेत महालक्ष्मि त्वया विना ॥ १२ ॥ तावद्विराजते रूपं तावच्छीलं विराजते। तावत्गुणा नराणां च यावल्लक्ष्मीः प्रसीदति ॥ १३ ॥ लक्ष्मि त्वयालंकृतमानवा ये पापैर्विमुक्ता नृपलोकमान्याः गुणैर्विहीना गुणिनो भवंति दुःशीलिनः शीलवतां वरिष्ठाः ॥ १४ ॥ लक्ष्मीर्भूषयते रूपं लक्ष्मीर्भूषयते कुलम्। लक्ष्मीर्भूषयते विद्यां सर्वाल्लक्ष्मीर्विशिष्यते ॥ १५ ॥

लक्ष्मि त्वद्गुणकीर्तनेन कमलाभूर्यात्यलं जिह्मतां रुद्राद्या रविचंद्र-देवपतयो वक्तुं च नैवक्षमः । अस्माभिस्तव रूपलक्षणगुणान्वक्तुं कथं शक्यते मातर्मां परिपाहि विश्वजननि कृत्वा ममेष्टं ध्रुवम् ॥१६॥ दैन्यार्तिभीतं भवतापपीडितं धनैर्विहीनं तव पार्श्वमागतम्। कृपानिधित्वान्मम लक्ष्मि सत्वरं धनप्रदानाद्धननायकं कुरु ॥१७॥ मां विलोक्य जननि हरिप्रिये निर्धनं तव समीपमागतम्। देहि मे झटिति लक्ष्मि कराग्रं वस्त्रकांचनवरान्नमद्भुतम् ॥ १८ ॥ त्वमेव जननी लक्ष्मि पिता लक्ष्मि त्वमेव च । भ्राता त्वं च सखा लक्ष्मि विद्या लक्ष्मि त्वमेव च ॥ १९ ॥ त्राहि त्राहि महालक्ष्मि त्राहि त्राहि सुरेश्वरि। त्राहि त्राहि जगन्मातर्दारिद्र्यात्त्राहि वेगतः ॥ २० ॥ नमस्तुभ्यं जगद्धात्रि नमस्तुभ्यं नमो नमः । धर्माधारे नमस्तुभ्यं नमः संपत्तिदायिनी ॥२१॥ दरिद्रार्णवमग्नोऽहं निमग्नोऽहं रसातले। मज्जंतं मां करे धृत्वा सूद्धर त्वं रमे द्रुतम् ॥२२॥ किं लक्ष्मि बहुनोक्तेन जल्पितेन पुनः पुनः । अन्यन्मे शरणं नास्ति सत्यं सत्यं हरिप्रिये ॥ २३ ॥ [ एतच्छ्रुत्वागस्तिवाक्यं हृष्यमाणा हरिप्रिया। उवाच मधुरां वाणीं तुष्टाहं तव सर्वदा ॥ २४ ॥ लक्ष्मीरुवाच ॥ यत्त्वयोक्तमिदं स्तोत्रं यः पठिष्यति मानवः ॥ शृणोति च महाभागस्तस्याहं वशवर्तिनी ॥२५॥ नित्यं पठति यो भक्त्या त्वलक्ष्मीस्तस्य नश्यति ॥ रणश्च नश्यते तीव्रं वियोगं नैव पश्यति ॥ २६ ॥ यः पठेत्प्रातरुत्थाय श्रद्धाभक्तिसमन्वितः ॥ गृहे

तस्य सदा स्थास्ये नित्यं श्रीपतिनासह ॥ २७ ॥ सुखसौभाग्यसंपन्नो मनस्वी बुद्धिमान् भवेत् ॥ पुत्रवान् गुणवान् श्रेष्ठो भोगभोक्ता च मानवः ।२८॥ इदं स्तोत्रं महापुण्यं लक्ष्म्यगस्तिप्रकीर्तितम् । विष्णुप्रसादजननं चतुर्वर्गफलप्रदम् ॥२९॥ राजद्वारे जयश्चैवशत्रोश्चैव पराजयः भूतप्रेतपिशाचानां व्याघ्राणां न भयं तथा ॥३०॥ न शस्त्रानलतोयौघाद्भयं तस्य प्रजायते ॥ दुर्वृत्तानां च पापानां बहुहानिकरं परम् ॥३१॥ मंदुराकरिशालासुः गवां गोष्ठे समाहितः ॥ पठेत्तद्दोषशांत्यर्थं महापातकनाशनम् ॥३२॥ सर्वसौख्यकरं नृणामायुरारोग्यदं तथा ॥ अगस्तिमुनिना प्रोक्तं प्रजानां हितकाम्यया ॥ ३३ ॥ ]

॥ इत्यगस्तिविरचितं श्रीलक्ष्मीस्तोत्रं संपूर्णम् ॥

॥ **श्रीलक्ष्मीःप्रीयताम्** ॥

## १३ श्रीमहालक्ष्म्यष्टक-स्तोत्रम् ।

[ ही इंद्रकृत श्रीमहालक्ष्मीची स्तुति आहे. आठ श्लोकांच्या या स्तोत्रांत प्रत्येक श्लोकाच्या शेवटीं 'नमोऽस्तुते' असें नमन आहे. दिवसा एकवार पठण केलें असतां महापापाचा नाश, दोनदां पठण केलें असतां धनधान्य समृद्धि, आणि तीनदां पठण केलें असतां शत्रुनाश असें याचें फल सांगितलें आहे. ]

